| MHNS190017962023 | फौजदारी चौकशी अर्ज क्र. ३४३/२०२३.<br>अरबिना आकिब चौधरी.<br>विरुध्द<br>आकीब मेहमुब चौधरी. |
| --- | --- |

निशाणी १८ वरील आदेश
दिनांक ०४.०७.२०२४.

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज अंतरिम पोटगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदाराने तिच्या अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न दिनांक ०१.०१.२०२३ रोजी झाले. गैरअर्जदाराच्या घरची परिस्थिती सधन आहे. त्याचा गावाकडे कुक्कुट पालनाचा व्यवसाय आहे तसेच तो किरकोळ व होलसेल अंडी विक्री करतो. त्यापासून त्याला पन्नास हजार रुपये मिळतात. तसेच मौजे पाटोदा येथे त्याला २—३ एकर बागायत शेती आहे व त्यापासून त्याला दोन ते तीन लाख उत्पन्न मिळते. गैरअर्जदाराचे निफाड येथे दोन बंगले आहेत तसेच एक जुने पत्राचे घर आहे व दोन गाळे आहेत. त्यापैकी एक गाळा, एक बंगला व एक पत्राचे घर भाडयाने दिले आहे व त्यापासून त्याला रुपये वीस हजार उत्पन्न मिळते. गैरअर्जदाराचे वडील महा. राज्य परिवहन मंडळातुन सेवानिवृत्त झाले आहे. याउलट, अर्जदाराला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. ती स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे.

३. सदर अर्जाचा निकाल लाण्यास बराच अवधी लागणार आहे. तोपर्यंत तिला रोजचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी अंतरिम पोटगीची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. गैरअर्जदार याने नि.क्र.१६ वर त्याचे मुळ अर्जाला म्हणणे दाखल केले आहे व त्याने नि.क्र. २३ अन्वये पुरसीस देवुन सदरचा जबाब अंतरिम अर्जाकरीता वाचण्याकरीता पुरसीस दिली आहे. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक ०१.०१.२०२३ रोजी अर्जदार व त्याचे लग्न झाले.

त्यापासून त्यांना अपत्य झाले नाही. लग्नानंतर अर्जदार ही लासलगाव येथे नांदण्यास आली. गैरअर्जदाराचे आई, वडील, भाउ व भावजई एकत्र राहत होते. अर्जदाराच्या आईवडीलांची परिस्थिती चांगली आहे. अर्जदाराचे डी. एड. चे शिक्षण झाले आहे. अर्जदार घरात काम करत नव्हती. मोबाईलमध्ये व्यस्त होती. ती गैरअर्जदाराला उध्दट बोलत होती व त्याचा तसेच त्याच्या आईवडीलांचा अपमान करत होती.

५. गैरअर्जदाराने अर्जदाराला कोणताही त्रास दिला नाही. लग्नानंतर अर्जदार वारंवार माहेरी जात होती. ती गैरअर्जदाराला म्हणत होती की, तु मला पसंत नाही, माझ्या आईवडीलांनी लग्न करुन दिले. तसेच मला तुझ्याबरोबर रहायचे नाही. परंतु गैरअर्जदाराने त्याकडे दुर्लक्ष केले.

६. दिनांक २१.०४.२०२३ रोजी अर्जदाराने त्याच्या आईवडीलांबरोबर भांडण केले, शिवीगाळ केली व तीने तिच्या भावाला फोन करुन बोलावुन घेतले व तीचा भाउ अर्जदाराला घेवुन गेला. अर्जदार जाताना सोबत दागिणे व कपडे घेवुन गेली. दिनांक २७.०४.२०२३ रोजी गैरअर्जदार तिला आणण्यासाठी तिच्या माहेरी गेला. परंतु तिने येण्यास नकार दिला. त्यानंतर ब–याच वेळा गैरअर्जदार तिला आणण्यासाठी गेला, परंतु अर्जदार नांदण्यास आली नाही.

७. दिनांक ३०.०७.२०२३ रोजी गैरअर्जदार हा अर्जदाराला आणण्यासाठी गेला. त्यावेळी अर्जदार व तिच्या आईवडीलांनी त्याला शिवीगाळ केली व १५ लाख रुपये देवुन फारकत देण्यास सांगितले व नांदायला येण्यास नकार दिला. गैरअर्जदार हा अर्जदाराला नांदविण्यास तयार आहे परंतु अर्जदार नांदायला येण्यास तयार नाही. त्याने अर्जदाराचा छळ केला नाही.

८. गैरअर्जदारावर त्याच्या आईवडीलांची जबाबदारी आहे. तो बेरोजगार आहे. अर्जदार उच्चशिक्षीत आहे. ती डी. एड. झाली आहे. ती विद्यार्थ्यांचे क्लासेस घेते व ब्युटी पार्लरचे काम करते व तिला रुपये २५०००/– ते ३०,०००/– उत्पन्न मिळते. अशाप्रकारे गैरअर्जदाराने अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्याची विंनती केली.

**९**. अर्जदाराने नि.क्र.०४ अन्वये तिचे उत्पन्नाचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच गैरअर्जदाराने त्याचे उत्पन्नाचे शपथपत्र नि.क्र.२२ वर दाखल केले आहे.

**१०**. अर्जदारांच्या अर्जातील कथने व गैरअर्जदाराच्या म्हणण्यातील कथने यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारात उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी पुढे नमुद कारणमिमांसेसह देत आहेः—

| **अ.क्र.** | **मुद्दे.** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदाराकडुन दरमहा रुपये २०,०००/— अंतरिम पोटगी मिळण्यास अर्जदार ही पात्र आहे काय? | दरमहा रुपये ३०००/—. |
| २. | गैरअर्जदाराकडुन अर्जाचा खर्च म्हणुन रुपये ५,०००/— मिळण्यास अर्जदार ही पात्र आहे काय? | रुपये १०००/—. |
| ३. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसा.**

**मुद्दा क्र.१ व २ करीताः—**

**११**. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, तिचे व गैरअर्जदार यांचे लग्न दिनांक ०१.०१.२०२३ रोजी झाले. गैरअर्जदाराने नि.क्र.१६ वर त्याचे म्हणणे दाखल केले आहे. त्याने त्याच्या म्हणण्यामध्ये त्याचे व अर्जदाराचे लग्न दिनांक ०१.०१.२०२३ रोजी झाल्याचे कथन केले आहे.

**१२**. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दिनांक २१.०४.२०२३ पासून ती तिच्या माहेरी राहत आहे. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार ही तिच्या भावाबरोबर स्वतःहुन माहेरी गेली आहे. अर्जदाराने तिच्या अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ नि.क्र.१९ वर स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे.

**१३**. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदाराने तिन.क्र.०४ वर तिचे उत्पन्नाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये तिला उत्पन्न नसल्याचे नमुद केले आहे. गैरअर्जदाराने त्याच्या

म्हणण्यामध्ये तो बेरोजगार असल्याचे नमुद केले आहे. त्याने नि.क्र.२२ वर त्याचे उत्पन्नाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये गैरअर्जदार हा मजुरी करत असल्याचे व त्याला दरमहा रुपये आठ ते नउ हजार उत्पन्न असल्याचे नमुद केले आहे.

**१४**. अर्जदाराने दिनांक ०७.०२.२०२४ रोजीचे खरेदीखताची प्रत दाखल केली आहे. मी त्याचे अवलोकन केले. सदर खरेदीखतामध्ये अकिब मेहबुब चौधरी यांनी मौजे शिरसगाव लौकी येथील, गट क्र.२४/२ पैकी, पुर्वेकडील ६० आर. व उत्तरेकडील ३० आर. निता रामदास उगले यांच्याकडुन खरेदी घेतल्याचे नमुद केले आहे. तसेच अर्जदाराने पिंपळगाव नजीक, ता. निफाड येथील भुमापन गट क्र. २/प्लॉट/२३ चा उतारा दाखल केला आहे. सदरची मिळकत शाहीन मेहबुब चौधरी यांच्या मालकीची असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदाराचे नाव सदर उता—यामध्ये नाही. तसेच अर्जदाराने मौजे पाटोदा, ता. येवला येथील गट क्र. ११२/२ चा उतारा दाखल केला आहे. सदर मिळकत रजिया चौधरी, रशिद मेहमुब व रमजु मोहम्मद व हनीफ चौधरी यांच्या मालकीची असल्याचे दिसुन येते. त्यामध्ये गैरअर्जदाराचे नाव नाही.

**१५**. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदार हिचे डी.एड. पर्यंत शिक्षण झाल्याचे व ती शिकवण्या घेत असल्याचे तसेच तीचा ब्युटी पार्लरचा कोर्स झाल्याचे नमुद केले आहे. परंतु गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

**१६**. गैरअर्जदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदार ही त्याची पत्नी असल्याचे नमुद केले आहे. तसेच अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याचे नमुद केले आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराला तिच्या मुलभुत गरजा भागविण्यासाठी पैशांची आवश्यकता असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदाराने त्याच्या शपथपत्रामध्ये तो मजुरी करत असल्याचे त्याला दरमहा रुपये ८०००/— ते ९०००/— मिळत असल्याचे नमुद केले आहे. तसेच अर्जदाराने दाखल केलेल्या दिनांक ०७.०२.२०२४ रोजीच्या खरेदीखतावरुन गैरअर्जदाराने शिरसगाव लौकी येथील गट २४/२ पैकी

९० आर. जमिन खरेदी केल्याचे दिसुन येते. अशा परिस्थितीत गैरअर्जदाराकडुन अंतरिम पोटगी मिळण्यास अर्जदार पात्र असल्याचे दिसुन येते. म्हणुन मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र.३ करीता</u>**:—

**१७**. मी मुद्दा क्र.१ व २ करीता नोंदविलेली कारणमिमांसा व निष्कर्ष याआधारे पुढील आदेश पारीत करतो:—

**<u>आदेश</u>**:—

**१.** नि.क्र.१८ वरील अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**२.** गैरअर्जदाराने अर्जदार यांना अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये ३०००/— अंतरिम पोटगी म्हणुन मुळ अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत द्यावेत.

**३.** गैरअर्जदाराने अर्जदार यांना सदर अर्जाचा खर्च म्हणुन रुपये १०००/— द्यावेत.

आदेश खुल्या न्यायालयात टंकलिखीत व जाहिर करण्यात आला.

LIGADE MILIND SIDRAM

Digitally signed by LIGADE MILIND SIDRAM
Date: 2024.07.04 17:27:17 +0530

**स्थळ:— येवला.**
**दिनांक:— ०४.०७.२०२४.**

**(एम. एस. लिगाडे)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,**
**येवला, जि. नाशिक.**

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करतो की, या न्यायनिर्णय/आदेशामधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णय/आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नावः — | प्रशांत अर्जुन बारगल, निम्नश्रेणी लघुलेखक. |
| न्यायालयाचे नाव :— | श्री. एम. एस. लिगाडे, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,येवला, जि.नाशिक. |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीखः— | ०४.०७.२०२४. |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली केलेली न्यायनिर्णय/आदेशाची तारीख. | ०४.०७.२०२४. |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची | ०४.०७.२०२४. |